


म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा.वा.
दा. क्र. १५४८५

IRBK-0115475

स्था. ता. १५८७५
२-७-१-७८

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १५८७५ ग्रं. दि २-७-९-७८
वि. स्था. ता. ग्रं. ....................

मराठी
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

1 7 DEC 1978

[कृ. मा. प.]

# माझ्या आवडत्या गोष्टी

राम काळे



IRBK-0115475

विजय प्रकाशन

विजय प्रकाशन, सीताबर्डी नागपूर-१२

बालमित्रांनो !
'माझ्या आवडत्या गोष्टी'
तुमच्या हाती देतांना
मला अतिशय आनंद होतो आहे
त्या 'तुमच्या आवडत्या गोष्टी'
व्हाव्या हीच अपेक्षा !

तुमचा

राम काळे


□ विजय प्रकाशन क्र. ३

□ प्रकाशिका,
सौ. जयश्री उपाध्याय,
विजय प्रकाशन,
विजय भवन,
कोष्टीपुरा मार्ग,
सीतावर्डी, नागपूर. १२

□ मुद्रक,
श्री. रतिलाल शाह,
श्री. प्रिंटींग प्रेस,
चितार ओळ चौक, नागपूर.

□ प्रथम आवृत्ती,
दिनांक २६–२–७३

□ चित्रकार,
दि. के. मनोहर

□ किंमत
एक रुपया पन्नास पैसे

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. १५४८५ दि.
वि.

# माझ्या आवडत्या गोष्टी

राम काळे

# अनुक्रम


(१) परिवर्तन (तरुण भारत) १

(२) बचेंगे तो और भी लढेंगे (मुलांचे मासिक) ७

(३) मी भिकारीच बरा (तरुण भारत, मुलांचे मासिक) १३

(४) जे होते ते बऱ्याकरिताच (तरुण भारत) १८

(५) हे म्हातारे बाबा कोण (किशोर मासिक) २६

(६) दोन अश्रू ३०

(७) गुरुदक्षिणा (किशोर मासिक) ४४

(८) बंडू आणि चंदू (विकास वार्ता) ४६

## १ : परिवर्तन

त्याचं नाव वंदन. मराठी चौथ्या वर्गात शिकत होता तो. स्वभावानं फारच गर्विष्ठ होता. कध्धी म्हणून कुणाला मदत करायचा नाही. वर्गातील मुलं कधी त्याला पेन मागायचे, कधी वही, तर कधी एखादं पुस्तक. पण तो कधीच देत नसे. दुसऱ्याला मदत करणं त्याच्या स्वभावातच नव्हतं.

एकदा त्याला वाटलं, आपण मामाच्या गावाला जावं. त्यानं आईची परवानगी घेतली. आणि मामाच्या गावाला जायला निघाला.

मामाचा गांव फार लांब होता. वाट जंगलाची होती. नागमोडीची होती. चढउताराची होती. वन्य प्राण्यांची भीति होती. सुर्यास्ताच्या आंत पोचायला हवं होतं. तो घाईघाईनं जात होता.

वंदन थोडं अंतर चालून गेला. रस्त्यांत त्याला एक म्हातारी भेटली. तिच्याजवळ एक मोळी होती. म्हातारी मोळी उचलण्याचा प्रयत्न करीत होती. परंतु काही केल्या

तिला ती उचलत नव्हती. ती पुनःपुन्हा प्रयत्न करीत होती. आणि अंगावर घेऊन पडत होती.

तेवढ्यांत समोरून तिला वंदन येतांना दिसला. ती अगतिकपणे त्याला म्हणाली,

'बाळ! जरा मोळी उचलण्यास हात लावतोस का ?'

'छे! मला फार घाई आहे.' असं म्हणून वंदन घाईघाईनं निघून गेला.

तो थोडा पुढं गेला.

त्याला एक गाय भेटली. ती आपल्या वासराबरोबर आनंदानं चरत होती. परंतु कशाला कुणास ठाऊक ! तिचं वासरूं बुजलं होतं. आणि शेजारच्या वेलीत गुंतून पडलं होतं. ते खूप धडपड करीत होतं. जोरजोरानं ओरडत होतं. पण काही केल्या त्याची सुटका होत नव्हतो. गायही जोरजोरानं हंबरत होती.

तेवढ्यात तिला समोरून वंदन येतांना दिसला. ती धावत धावत त्याच्याजवळ आली. आणि त्याला म्हणाली,

'बाळ ! माझं वासरूं त्या वेलीत गुंतून पडलं आहे. त्याला सोडविण्यास मदत करतोस काय ?'

'छे ! मला फार घाई आहे.' असं म्हणून वंदन पुढं निघून गेला.

तो आणखी थोडं अंतर चालून गेला.

समोर त्याला एक छत्री भेटली. ती उघडलेली होती. त्यामुळं सोसाटयाच्या वाऱ्याबरोबर ती उडत होती. जंगलातल्या काटक्यांना अडत होती. जागोजाग फाटत होती. तिनं वंदनला येतांना पाहिलं. आणि ती त्याला म्हणाली,–

'बाळ ! उघडी असल्यामुळं माझे फार हाल होत आहे. जरा मला मिटून देतोस काय ?'

'छे ! मला फार घाई आहे.' असं म्हणून वंदन घाईघाईनं निघून गेला.

सुर्यास्ताच्या आत तो मामाच्या गावी पोचला. चार दिवस आनंदात राहिला. पांचव्या दिवशी तो गावाला परतला.

वंदन वाट चालत होता. तो खूप दूर आला होता. ऊन कडक झालं होतं. वारा अग्नी होऊन त्याच्या अंगाला चटके देत होता. त्याच्या अंगाची लाही लाही होत होती. सावलीची त्याला गरज होती.

तेवढयात त्याला छत्री दिसली. वंदन घाईघाईनं तिच्याजवळ गेला. आणि तिला म्हणाला,–

'छत्रीताई, छत्रीताई, मला खूप ऊन लागत आहे. थोडी सावली धरतेस काय ?'

'छे! मला फार घाई आहे.' असं म्हणून तिनं वंदनकडं एका चमत्कारिक दृष्टीनं पाहिलं. आणि ती पुढं निघून गेली.

वंदन चालतच होता. आता तो खूप थकला होता. त्याच्या पोटात कावळे कोकलत होते. आणि त्याच्याजवळ तर खाण्याचे जिन्नस नव्हते.

तेवढ्यात त्याला तीच गाय दिसली. तो धावतच गाईजवळ आला. आणि तिला म्हणाला,–

'गोमाता, गोमाता, मला खूप भूक लागली आहे. थोडं दूध देतेस काय?'

'छे, माझं बाळ भुकेनं तडफडत आहे. त्याला आधी पाजलं पाहिजे मला. मी फार घाईत आहे.' असं म्हणून तीही घाईघाईनं निघून गेली.

वंदन गोरामोरा झाला.

उन्हाचे चटके त्याच्या अंगाला झोंबत होते. पोटात कावळ्यांची काव काव सुरूच होती. पण अशा या जंगलात त्याला काय खायला मिळणार? तो विचार करीत होता. तेवढ्यात त्याला एक विहीर दिसली. तीवर एक म्हातारी पाणी काढीत असलेली त्यानं पाहिली. वंदनला वाटलं, 'खायला नाही तर नाही. विहीरीवर जावं. म्हातारीला पाणी मागावं'. आणि पाण्यानंच आपलं पोट भरून घ्यावं.' म्हणून तो धावतच विहीरीजवळ आला. आणि त्या म्हातारीला म्हणाला,–

'आजीबाई, आजीबाई, मला खूप तहान लागली आहे. थोडं पाणी देतेस काय ?'

'छे ! तुला पाणी देत बसले तर, मला मोळी विकायला उशीर होईल. मी फार घाईत आहे.' असं म्हणून ती म्हातारीही घाईघाईनं निघून गेली.

आता त्याच्या शरीरात मुळीच त्राण उरलं नव्हतं. एक पाऊलसुद्धा त्याच्यानं चालवत नव्हतं. त्याला ग्लानी येत होती.

तेवढ्यात समोरून एक गोसावी आला. त्यानं भगवे कपडे घातले होते. त्याची दाढी वाढलेली होती. काखेत एक झोळी होती. आणि तोंडानं 'ओम् नमः शिवाय ऽऽऽ ओम् नम्: शिवाय ऽऽ' असं म्हणत तो चालला होता.

वंदन कसाबसा त्याच्याजवळ पोचला. आणि त्याला म्हणाला,–

'म... म.. महाराज, म... म... मला थो.... डं पा... पाणी... द्या.' आणि तो धाडकन त्याच्या पायावर कोसळला.

गोसाव्यानं त्याला चटकन उचललं. जवळच्या झाडाच्या सावलीत नेऊन झोपविलं. त्याच्या तोंडावरून हात फिरविला. कमंडलूतील पाणी त्याच्या तोंडावर शिंपडलं. त्या थंडगार पाण्याच्या शिडकाव्यानं त्याला बरं

वाटलं. तो शुद्धीवर आला. तेव्हा गोसाव्यानं त्याला पाणी पाजलं. झोळीतले खाण्याचे जिन्नस त्याला खायला दिले.

वंदनला फार फार बरं वाटलं.

तो गोसाव्याला म्हणाला,—

'महाराज, आज आपण भेटलात म्हणून माझे प्राण वाचले. नाहीतर...'

'अरे, पण तू कुणाला मदत मागायची असतीस.' गोसावी चटकन म्हणाला.

'मागितली. ऊन लागत होती म्हणून छत्रीला सावली मागितली, पण तिनं दिली नाही. भूक लागली होती म्हणून गाईला दूध मागितलं पण, तिनं दिलं नाही. तहान लागली होती म्हणून म्हातारीला पाणी मागितलं पण, तेही तिनं दिलं नाही.' वदननं एका दमात सारं काही सांगून टाकलं.

'ते सारं मला माहीत आहे, बाळ!' असं म्हणून गोसावी पुढं सांगू लागला, 'दुसऱ्यानी आपल्या उपयोगी पडावं असं वाटत असेल तर प्रथम आपण त्याच्या उपयोगी पडायला शिकलं पाहिजे.'

वंदन त्याच्याकडं बघतच राहिला.

☆☆☆

## २ : बचेंगे तो और भी लढेंगे

'घात झाला ! पाटील, घात झाला !'

'काय झालं ?' दत्ताजीनं दचकून विचारलं.

'पाटील, बाळासाहेब गोळी लागून पडले !' एका हुजऱ्यानं धावत येऊन बातमी दिली.

दत्ताजीनं ते शब्द ऐकले मात्र !

त्यांच्या कानांत कुणीतरी गरम गरम तेल ओतीत आहे, असा त्यांना भास झाला. त्यांची मुद्रा क्रोधानं संतप्त झाली. मुठी आवळल्या गेल्या. दात करकरा आवाज करू लागले. बाहू स्फुरण पाऊ लागले.

'जनकोजी बाबा ! जनकोजी बाबा !' दत्ताजी कळवळून उद्गारले.

त्यांच्या लाडक्या पुतण्याला गोळी लागली होती.

दत्ताजीला वाटलं, आता आपण जिवंत राहून काय करायचं ? कोणत्या तोंडानं घरी परत जायचं ? त्यापेक्षा रणांत मृत्यु आलेला बरा !

'बोला ! हरहर महादेव !' दत्ताजीनं सिंहगर्जना केली. आणि ते बाणासारखे शत्रूच्या सैन्यांत घुसले.

दोन्ही सैन्यांत निकाराची लढाई सुरू झाली.

'मारा ! कापा ! कापा ! मारा !' सारखे आवाज उठत होते. शेकडो सैनिकांची डोकी आकाशांत उडत होती. भडभुंजे लोक लाह्या भाजतांना त्या जशा तटातट फुटून कढईतून वर उडतात तशी सैनिकांची शिरं आकाशांत उडत होती. मुसळधार पाऊस पडावा तसा सर्वत्र बाणांचा वर्षाव होत होता. जिकडं तिकडं एकच गर्दी उडाली होती. घोडी व माणसे धुंद झाली होती. जवळचा माणूस ओळखायला येत नव्हता.

'तेथे मातला कल्लोळ
वाहे शोणिताचा खळाळ
क्रोधे खवळले उभयदळ
घुमो लागली रणभूमी !'

अशी स्थिति झाली होती.

'मारा ! कापा ! सोडू नका हरामजाद्यांना !' दत्ताजी जोरजोरानं ओरडत होते. त्यांच्या अंगातून रक्ताच्या धारा वाहांत होत्या. पण त्याची त्यांना पर्वा नव्हती. ते आपली तरवार चालवितच होते. एकेका वारासरशी शत्रूच्या शेकडो सैनिकांची शिरं आकाशांत उडत होती. धडं जमिनीवर कोसळत होती.

दत्ताजी लालमणी नांवाच्या घोडीवर स्वार झाले होते. ती शत्रूच्या सैन्यांत मुसंडी मारीत होती. चौखूर उधळत होती. आपल्याकडील सैनिकांची शिरं आकाशांत उडतांना पाहून ती चिडली होती. नागिणीसारखी फुसफुसत होती. आपला क्रोध व्यक्त करीत होती.

'मारा ! कापा ! हरहर महादेव !' दत्ताजीनं पुन्हा एकदा सिंहगर्जना केली. आणि ते नव्या जोमानं शत्रूच्या सैन्याची कापाकापी करू लागले.

तेवढ्यांतः—

यशवंत जगदाळे नांवाच्या सरदाराला गोळी लागली. आणि तो धाडकन जमिनीवर कोसळला.

'मुडदा ओढा ! बाहेर काढा !' पिराजी जगदाळे जोरजोरानं ओरडत होता. आपल्या भावाचं प्रेत शत्रूच्या हाती लागू नये म्हणून, प्रयत्न करीत होता. त्याचा हा आवाज दत्ताजीच्या कानावर गेला. तेव्हा त्यांनी लाल-मणीला किंचित् मागे वळवून 'मुडदा ओढा ! काढा !' अशी आरोळी ठोकली.

तेवढ्यांत एक गोळी सूंऽऽ सूंऽऽ आवाज करीत दत्ताजीच्या दिशेनं आली. आणि डोळ्याची पापणी लवते न लवते इतक्यांत त्यांच्या बरगडीत घुसली.

दत्ताजी धाडकन जमिनीवर कोसळले.

तानाजी, राजाराम चोपदार व राघोबा शेणवी पागनीस जवळच होते. ते धावतच दत्ताजीच्या मदतीला आले.

दत्ताजी शेवटचा श्वास घेत होते.

दत्ताजी त्यांचे सेनापती होते. त्यांच्या अन्नावर आजपर्यंत त्यांचे प्राण जगले होते. त्यांच्या भरंवशावरच आजपर्यंत त्यांना पाहिजे तेवढे विलास करता आले होते. तेव्हा दत्ताजीला वाचविणं त्यांचं कर्तव्यच होत. ते त्या प्रयत्नास लागले.

'पण दत्ताजीला न्यावं कोठे ?' सारे विचार करू लागले. 'आबदुल अली दुराणी आला तर दत्ताजीसह आपलीही डोकी कापून नेईल.'

तेवढ्यांत समोरून कुतुबशहा अंबारीत बसून येतांना दिसला. वास्तविक तो शत्रूपक्षाकडीलच. परंतु त्यांची-यांची पूर्वीची ओळख होती. त्यामुळं राघोबा पागनिसाला वाटलं की, त्यालाच दत्ताजीचे प्राण वाचविण्यास सांगावं. म्हणून त्यानं राजाराम चोपदाराला कुतुबशहाकडं पाठविलं.

राजाराम धावतच कुतुबशहाच्या अंबारीजवळ गेला. कुतुबशहानं राजारामाला ओळखलं. आणि विचारलं, 'राजाराम, तुम उधर कहाँ ?'

'साहेब, पाटील घायाळ होऊन पडले आहेत. कृपा करून त्यांना वाचवावे.' राजाराम कळवळून म्हणाला.

पाटील घायाळ होऊन पडले आहेत.' हे शब्द कुतुबशहानं ऐकले मात्र ! त्याला खूपच आनंद झाला. जणू गाईच्या कासेतून दुधाऐवजी एकदम लोणीच त्याच्या हाती आलं होतं. त्याचा आनंद मनांत मावत नव्हता. त्यानं आनंदातिशयानं राजारामाला विचारलं,

'पटेल कहाँ है ? दिखलाव !'

'हे येथे आहेत.' असं म्हणून राजाराम चोपदारानं कुतुबशहाला दत्ताजीजवळ नेलं.

कुतुबशहानं दत्ताजीला पाहिलं मात्र ! ऊसातून एकदम साखरच आपल्या हाती आली आहे, असा त्याला भास झाला. तो अंबारीतून खाली उतरला. आणि मोठ्या ऐटीत दत्ताजीजवळ आला.

दत्ताजी अस्ताव्यस्त पडले होते. त्यांच्या डोळ्यावर झापड आली होती. बगलेतून रक्ताची धार वाहात होती. शेवटच्या क्षणाची ते वाट बघत होते.

'पटेल, तुम हमारे साथ और भी लढेंगे !' कुतुबशहानं कुत्सितपणे विचारलं.

मोठ्या कष्टानं दत्ताजीनं डोळे किलकिले केले. कुतुबशहाला समोर पाहाताच त्यांची जीभ चावली. त्यांच्या ओठातून शब्द फुटत नव्हता. बरगडीतून असह्य वेदना उठत होत्या.

दत्ताजीनं गपकन् डोळे मिटले.

'क्या पटेल, तुम हमारे साथ और भी लढेंगे !' कुतुबशहा पुन्हा विचारीत होता.

दत्ताजीनं मोठ्या प्रयासानं दृष्टी वर उचलली. आणि आपल्या छातीवर धडाधड मूठ आपटीत मोठ्या बाणेदारपणानं उत्तर दिलं,

'इनशा अला ताला ! बचेंगे तो और भी लढेंगे !'

कुतुबशहानं दत्ताजीचं उत्तर ऐकलं मात्र !

त्याची तळपायाची आग मस्तकांत गेली. संतापानं त्याचे डोळे लाल झाले. मंदावलेल्या विस्तवावर रॉकेल ओततांच जसा भडका उडतो तसा कुतुबशहा भडकला. त्यानं दत्ताजीला लाथेनं पालथं पाडलं. त्यांच्या छातीवर बुटाभरली लाथ ठेवली. एका हातानं त्यांचे केस आवळून धरले. दुसऱ्या हातानं कमरेचा चकाकता सूरा काढला.

आणि . . .

एका क्षणांत दत्ताजीचं शीर धडावेगळं केलं.

दत्ताजीच्या निर्जिव शरीरातून रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या.

त्या रक्ताचा थेंब न थेंब कुतुबशहाला पुन:पुन्हा सांगत होता–

'लढेंगे !

और भी लढेंगे !!

इनशा अला ताला ! बचेंगे तो और भी लढेंगे !!

☆ ☆ ☆

## ३ : मी भिकारीच बरा !

एका गांवात एक भिकारी राहात होता. तो घरो--घर भीक मागायचा. कसंबसं आपलं पोट भरायचा. कधी त्याला उपवास पडायचा, तर कधी तो पोटभर खायचा. अंगावर चिंध्या पांघरायचा. त्यांतून त्याच्या शरीराची हाडं स्पष्टपणे मोजता येत होती.

एक दिवस तो भिक्षा मागायला गेला. खूप खूप फिरला तो. पण त्याला कुणीच भिक्षा घातली नाही. त्याला खूप भूक लागली होती. भुकेमुळं त्याचा जीव कासाविस होत होता. एक तुकडा मिळण्याच्या आशेवर तो कसाबसा हिंडत होता. पण त्याला कुणीच भिक्षा घातली नाही. तो तसाच घरी आला. तांब्याभर पाणी पिऊन त्यानं आपल पोट भरून घेतलं. व तो झोपी गेला. झोपतांना त्यानं देवाची प्रार्थना केली. तो देवाला म्हणाला,- 'देवा ! मला केव्हा रे श्रीमंत करशील ?' रात्रभर तो या कुशीवरून त्या कुशीवर तळमळत पडला होता. त्याच्या डोक्यांत सारखे विचार येत होते. त्या रात्री त्याला केव्हा झोप आली ते कळलेच नाही.

त्याला एक स्वप्न पडलं. स्वप्नांत एक भगवे कपडे घातलेला गोसावी आला. तो भिकाऱ्याला हळूच म्हणाला, 'तुला श्रीमंत व्हायचय् ना !'

'होय.' भिकारी म्हणाला.

'मग माझं ऐक. उद्या सकाळी तुझ्या दारांत एक मांजर येईल. त्याला तू ठार मार. ते सोन्या चं होऊन पडेल. तुझी इच्छा पूर्ण होईल.' गोसावी म्हणाला.

भिकारी दचकून जागा झाला. त्यानं आजूबाजूला पाहिलं पण तिथं गोसावी नव्हता नि कुणीच नव्हतं. तो विचार करू लागला.–'आपणास असं स्वप्न कां पडलं ?' आणि त्या विचाराच्या तद्रीतच त्याला पुन्हा झोप लागली.

दुसरा दिवस उजाडला. भिकारी जागा झाला. त्यानं आपल्या झोपडीचं दार उघडलं. आणि पाहतो तो त्याच्या दारांत एक मांजर ! त्याला रात्रीच्या स्वप्नाची आठवण झाली. स्वप्नांत त्याला ते मांजर ठार मारायला सांगितलं होतं. ते सोन्याचं होणार होतं. त्याचं श्रीमंत मन म्हणालं, 'हं... बघतोस काय असा ? घे एक सोटा अन् लाव त्या मांजराच्या टाळक्यांत !' पण लगेच त्याचं भिकारी मन म्हणालं, ' या निष्पाप मांजराला मी ठार मारू ? छे, ते माझ्यानं होणार नाही. या चिमुकल्या जिवाला ठार मारून श्रीमंत होण्यापेक्षां मी भिकारीच बरा !...'

त्याच्या हृदयांत दोन मनाचा झगडा सुरू झाला. त्यांत त्याच्या भिकारी मनाचा विजय झाला. त्यानं त्या मांजराला जवळ घेतलं. त्याच्या पाठीवरून प्रेमानं हात फिरविला. त्याचा एक गोड पा पा घेतला. आणि त्याला सोडून दिलं.

त्या दिवशी पुन्हा तो भीक मागायला गांवभर फिरला. पण त्याला कुणी भिक्षा घातली नाही. तो तसाच घरी आला. तांब्याभर पाण्यानं त्यानं आपलं पोट भरून घेतलं. व तो झोपी गेला.

त्याला पुन्हा स्वप्न पडलं. स्वप्नांत तोच रात्रीचा गोसावी आला. तो भिकाऱ्याला म्हणाला, 'तुला श्रीमंत व्हायचं होतं ना? मग तू त्या मांजराला कां मारलं नाहीस?'

'त्या चिमुकल्या जिवाला ठार मारून मला श्रीमंत व्हायला सांगतोस! छे! ते माझ्यानं होणार नाही! त्यापेक्षा मी भिकारीच बरा!...' भिकाऱ्याचं हे उत्तर ऐकून गोसावी गुप्त झाला.

दुसरे दिवशी सकाळी भिकारी जागा झाला. त्यानं आपल्या झोपडीचं दार उघडलं आणि पाहतो तो काय आश्चर्य! तेच मांजर त्याच्या दारांत मरून पडलेलं! त्याला अतिशय दु:ख झालं. दु:खयुक्त अंत:करणानं तो म्हणाला, 'अरेरे!...कुणी मारलं या निरपराध जिवाला...

श्रीमंत होण्याच्या लालसेनंच कुणीतरी हे भयंकर कृत्य केलं असावं ! कुणी मारलं याला ?'

'मीच मारलं त्याला.' तोच गोसावी त्याच्यापुढं उभा राहून बोलत होता.

'कोण आहेस तू ?' भिकारी म्हणाला.

'मी देव आहे.' गोसावी म्हणाला.

'या चिमुकल्या जिवाला ठार मारणारा तू देव म्हणवितोस ! कसं शक्य आहे ते ! देव दयाळू असतो. तो दीनांचं रक्षण करणारा असतो. पण तू तर या निष्पाप जिवाचा बळी घेतलास ! कोण म्हणणार तुला देव ?' भिकारी चिडून म्हणाला.

'शांत हो बाळ ! शांत हो ! तुझं मन मी जाणतो. तू प्रेमळ आहेस. दयाळू आहेस. याची मला खात्री पटली. म्हणूनच मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. तुझी इच्छा पूर्ण होईल.' गोसावी म्हणाला.

'पण तूं त्याला कां मारलस्' भिकारी हट्टानं म्हणाला.

'ती एक कहानी आहे.' असं म्हणून तो पुढं सांगू लागला. 'हे मांजर नसून पूर्वजन्मीचा तो एक ऋषी आहे. एका मोठ्या ऋषीच्या शापामुळं तो मांजर होऊन पडला होता. आणि त्याचा उद्धार माझ्या हातून व्हावयाचा होता.

म्हणूनच मी त्याला ठार मारलं. चल घे आटप लवकर. लाव त्याला हात !', गोसावी म्हणाला.

भिकाऱ्यानं त्या मेलेल्या मांजराला हात लावला मात्र ! ते एकदम सोन्याचं झालं ! भिकाऱ्याला मोठंच नवल वाटलं. त्याला खूप आनंदही झाला. त्यानं परमेश्वराचे पाय धरण्यासाठी दाराकडं धाव घेतली.

पण–तो होता कुठं ?

तो तर केव्हाच गुप्त झाला होता !

☆ ☆ ☆

# ४ : जे होते ते बऱ्याकरिताच !

'आजी, एक गोष्ट सांग ना ग ?' संध्याकाळच्या वेळी अंगणात बसलेल्या आजीच्या भोवती जमलेली मुलं म्हणत होती.

'शुभंकरोति आटोपली का सगळ्यांची ?' आजीनं विचारलं.

'होय.' सारी मुलं एकदम ओरडली.

पण सुरेश गप् होता. त्याला तसा पाहून आजी म्हणाली, 'तुला गोष्ट हवीय् ना ?'

'होय.' सुरेश म्हणाला.

'मग आधी जा. आणि शुभंकरोति आटोपून ये.' आजी म्हणाली.

सुरेश मुकाट्यानं उठला. त्यानं शुभंकरोति आटोपली. आणि आजीजवळ येऊन म्हणाला, 'आता सांग ना ग आजी गोष्ट ?'

'कशाची सांगू ?' आजी म्हणाली.

'कशाचीही सांग.' एक मुलगी म्हणाली.

'राजाची सांगू की, राणीची ?' आजीनं विचारलं.

'राजाची...राजाची.....' सारी मुलं एकदम ओरडली.

'एक होता राजा.' आजीनं गोष्ट सांगायला सुरुवात केली. तशी सारी मुलं आजीच्या शब्दाकडं कान लावून बसली. आजी पुढं सांगू लागली.

'त्याला काही कमी नव्हतं. सुंदरसा राजवाडा होता. नोकर चाकर होते. हत्ती घोडे होते. सारंऽऽसारं काही होतं. कश्शाची म्हणून वाण नव्हती.

एकदा काय झालं !

राजा शिकारीसाठी रानांत गेला. तेव्हा अचानक त्याचं बोट कापलं. त्यातून भळभळा रक्त वाहू लागलं. त्यामुळं त्याच्या सेवकांना खूप वाईट वाटलं. ते धावतच राजाजवळ आले. एकानं आपलं भरजरी उपरणं फाडलं. दुसऱ्यानं जखम धुतली. तिसऱ्यानं पट्टी बांधली. सारे राजाच्या सेवेसाठी झटत होते.

तेवढ्यांत, तेथे एक गोसावी आला.

सेवकाला वाटलं, त्याच्याजवळ काही झाडपाल्याची औषधी असेल. ती आणावी. राजाच्या बोटावर बांधावी. म्हणून तो त्या गोसाव्याला म्हणाला, 'महाराज, राजाचं

बोट कापलं. आपल्याजवळ काही औषधी असेल, तर देता काय ?'

'छान ! जे होते ते बऱ्याकरिताच होते !' गोसावी उद्गारला.

राजानं गोसाव्याचे ते शब्द ऐकले मात्र ! त्याला त्याचा खूपच राग आला. त्याला वाटलं, 'मी एवढा मोठा राजा. हा सारा प्रदेश माझा. सारे माझ्या-साठी धावून येतात; आणि हा क्षुल्लक गोसावडा म्हणतो, 'छान ! जे होते ते बऱ्याकरिताच होते !' ठीक आहे. त्याला चांगलीच अद्दल घडविली पाहिजे.

राजा गोसाव्याजवळ गेला. आणि लटक्या नम्रतेनं त्याला म्हणाला, 'महाराज, आपण मजबरोबर याल काय?'

राजाची आज्ञा कोण मोडील ? गोसावी मुकाट्यानं त्याच्या पाठोपाठ गेला.

राजा व गोसावी त्या भयंकर जंगलातून जात होते. दुपारची वेळ. उन कडक तापलं होतं. वारा गरम झाला होता. अंगाला चटके देत होता. तरीही ते चालतच होते.

तेवढ्यांत, गोसाव्याला तहान लागली. तो राजाला म्हणाला, 'राजेसाहेब, मला खूप तहान लागली.'

तेव्हा राजा त्याला म्हणाला, 'तो बघा. पुढं तलाव आहे. त्यावर आपण दोघंही पाणी पिऊ.'

गोसावी मुकाटयानं चालू लागला.

दोघंही तलावाजवळ येऊन पोचले. राजाच्या मनांत त्याच्याबद्दल राग होताच.

गोसावी पाणी पिण्यासाठी तलावाजवळ गेला.

तेवढयांत–

राजानं त्याला खोल पाण्यांत ढकलून दिलं. आणि तो त्याची गंमत पाहू लागला.

गोसावी तलावात गटांगळ्या खाऊ लागला. त्याच्या नाकातोंडात पाणी गेलं. त्याचा प्राण कासावीस झाला; पण तशाही अवस्थेत गोसावी म्हणत होता, 'जे होते ते बऱ्याकरिताच होते ! . . . जे होते ते बऱ्याकरिताच होते !'

राजा त्याच्याकडं बघतच राहिला. तो मनांत म्हणाला, 'माझं बोट कापलं तेव्हा हा म्हणाला, जे होते ते बऱ्याकरिताच होते. आणि आता मी त्याला तलावात ढकललं, त्याचा प्राण जायची वेळ आली, तरी हा म्हणतो, जे होते ते बऱ्याकरिताच होते !'

राजाला मोठं नवल वाटलं. त्यानं एकवार त्या गोसाव्याकडं आश्चर्यानं पाहिलं. आणि आपण त्याला चांगलीच अद्दल घडविली या समाधानानं तो तिथून निघून गेला.

राजा त्या भयंकर अरण्यातून एकटाच जात होता.

त्याच अरण्यांत काही रानटी लोक राहात होते. ते दरवर्षी एकत्र येऊन देवीचा उत्सव साजरा करीत असत. देवीला एक पूर्ण माणूस बळी देत असत.

आज त्यांचा उत्सव सुरू होता. देवीला बळी देण्यासाठी त्यांना एक माणूस हवा होता. ते माणसाच्या शोधातच होते.

तेवढ्यांत–

राजा तेथे जाऊन पोचला.

रानटी लोकांनी राजाला पकडलं. त्याचे हातपाय बांधले. आणि त्याला देवीजवळ नेलं.

तेलानं भरलेली एक मोठ्ठी कढई देवीपुढं मांडली होती. तिच्यातलं तेल उकळ्या मारीत होतं. त्या उकळत्या तेलांत ते राजाला टाकणार होते. त्याचा देवीला नैवेद्य करणार होते. आणि मग तेही त्याला कचाकच खाणार होते.

दोघांनी राजाला घट्ट पकडलं. एकानं त्याच्या कपाळाला सेंदूर फासला. दुसऱ्यानं बुक्का लावला. तिसऱ्यानं मंत्र म्हटले. चवथ्यानं त्याला उचललं. आणि तो आता त्याला त्या उकळत्या तेलात टाकणार !...

तेवढ्यांत...

राजाच्या बोटाला पट्टी बांधलेली त्याला दिसली. तो आपल्या साथीदारांना म्हणाला, 'याचा बळी देवीला चालणार नाही.'

'कां ?' सारे आश्चर्यचकित होऊन म्हणाले.

'याच्या बोटाला पट्टी आहे. म्हणजेच याच्या शरीरातून रक्त बाहेर गेलेलं आहे. तेव्हा तो पूर्ण माणूस होऊच शकत नाही. आणि देवीला तर पूर्ण माणूस हवा आहे.' तो म्हणाला.

झालं. राजा पूर्ण माणूस नाही म्हणून त्याला सोडण्यांत आलं.

राजाला खूप आनंद झाला. तो आपल्या राजधानीकडं निघाला.

राजा थोडं अंतर चालून गेला. तेव्हा त्याला तोच गोसावी पुन्हा भेटला. राजाला मोठं आश्चर्य वाटलं. आता त्याचा त्याच्यावरचा राग कुठल्या कुठं नाहीसा झाला होता. तो त्या गोसाव्याला म्हणाला, 'महाराज, माझं बोट कापलं तेव्हा आपण म्हणाला होता, जे होते ते बऱ्याकरिताच होते; आणि मी आपणास तलावांत ढकललं, आपण पाण्यांत गटांगळ्या खाऊ लागलात, तरी आपण म्हणाला, जे होते ते बऱ्याकरिताच होते !... असं कां ?'

'त्याचं असं आहे.' असं म्हणून गोसावी पुढं सांगू लागला, 'तुमचं बोट कापलं नसतं तर तुम्ही पूर्ण माणूस म्हणून त्या रानटी लोकांनी तुम्हाला देवीला बळी दिलं असतं. तुमचं बोट कापलं होत म्हणूनच तुम्ही वाचलांत. नाहीतर...यासाठीच मी त्यावेळी म्हटलं होतं, 'जे होते ते बऱ्याकरिताच होते !...'

'आणि मी तुम्हाला तलावांत ढकललं, तेव्हाही तुम्ही तसंच म्हणाले, ते कां ?' राजानं पुन्हा विचारलं.

तेव्हा गोसावी म्हणाला—

'तुम्ही मला तलावात ढकललं नसतं तर मी तुमच्याबरोबर असतो. तेव्हा दोघांनाही त्या रानटी लोकांनी पकडलं असतं. आणि तुम्ही पूर्ण माणूस नाही म्हणून तुमची सुटका झाली असती. पण मी ? मी मात्र पूर्ण माणूस म्हणून देवीला बळी गेलो असतो. तुम्ही मला तलावांत ढकललं म्हणूनच मी वाचलो. नाहीतर...! यासाठीच मी तेव्हाही म्हटलं होतं, जे होते ते बऱ्याकरिताच होते !...सारांश, संकटातही माणसाची समाधानी वृत्ती कायम असली तर त्यातूनच त्याच्या भविष्यकालीन सुखी जीवनाचा जन्म होतो'.

गोसाव्याचे हे शब्द ऐकून राजाला खूप आनद झाला. त्यानं त्याला राजवाड्यांत नेलं. त्याला सुंदर सुंदर वस्त्रे दिली. भरपूर संपत्ती दिली.

गोसावी खूष होऊन निघून गेला.

आजीची गोष्ट सांगून झाली होती.

त्याच वेळी सारी मुलं तिच्या मांडीवर झोपली होती. आजीनं एकेकाला उचलून आंथरुणांत नेऊन टाकलं.

☆ ☆ ☆

## ५ : हे म्हातारे बाबा कोण ?

चंपारण्यातली ही गोष्ट !

त्या वर्षी तेथे पाऊस पडला नाही. त्यामुळं पिकं सुकली. कुरणं करपली. गुराढोरांना चारा मिळेनासा झाला. शेतकरी चिंतातूर झाले. हवालदील झाले. आकाशाकडं पाहून पाहून त्यांचे डोळे पांढरे फटक झाले. ते ईश्वराची करुणा भाकू लागले.

त्याच वेळी तेथे एक मांत्रिक आला, त्यानं आपल्या पोथ्या चाळल्या. आणि शेतकऱ्यांना सांगितलं.

'तुमच्यावर देवीची अवकृपा झाली आहे. तिला संतुष्ट केल्याशिवाय पाऊस पडणार नाही. शेती पिकणार नाही.'

'मग काय करायचं ?' चिंतातूर शेतकऱ्यांनी विचारलं.

'देवीला एक बोकड बळी द्या. देवी संतुष्ट होईल. सर्वत्र पाऊस पडेल. दुष्काळाचा सुकाळ होईल. अश्रूंचा आनंद होईल.' मांत्रिकाने सांगितले.

शेतकरी अज्ञानी होता. संकटग्रस्त होता. त्यामुळं त्यांना वाटलं, मांत्रिकाच्या रूपानं परमेश्वरच जणू आपल्या मदतीला धावून आला. त्यांनी मांत्रिकाच्या शब्दावर विश्वास ठेवला.

आणि . . .

देवीला बोकड बळी द्यायचं ठरलं.

त्यांनी एक बोकड आणला. त्याला रंग लावला. शिंगाला रंगीबेरंगी वेगड लावला. गळ्यांत फुलांच्या माळा घातल्या. मस्तकावर गुलाल फासला.

एक मोठी मिरवणूक निघाली.

सर्वात पुढं सजविलेला बोकड होता. त्यामागं बैलांच्या जोड्या होत्या. माणसांच्या रांगा होत्या. बँड-बाजा होता. मिरवणूक मुख्य रस्त्यानं जात होती.

त्याच रस्त्यानं एक म्हातारे गृहस्थ काठी टेकीत येत होते. त्यांच्या अंगावर दोनंच वस्त्रे होती. त्यापैकी एक पंचा ते नेसले होते. व एक अंगाभोवती लपेटला होता. एवढी भव्य मिरवणूक कसली, म्हणून ते थांबले. त्यांनी एका शेतकऱ्याला जवळ बोलाविलं. आणि त्याला विचारलं,

'ही कसली मिरवणूक ?'

'अहो, म्हातारे बाबा ! तुम्ही गांवात राहाता की जंगलात ? तुम्हांस ठाऊक नाही ? अहो, आपल्या गांवा-

वर देवीची अवकृपा झाली आहे. म्हणून यंदा पाऊस पडला नाही. त्यासाठी देवीला संतुष्ट करायचं आहे. त्याचीच ही मिरवणूक आहे. हा सजविलेला बोकड आहे ना ! त्याला देवीला बळी द्यायचं आहे.' शेतकरी आनंदानं म्हणाला.

'देवीला बोकड बळी दिल्यानं पाऊस पडेल काय ?' ते म्हातारे गृहस्थ म्हणाले.

'होय.' शेतकरी म्हणाला.

'बोकड बळी दिल्यानं दुष्काळाचा सुकाळ होईल काय ?' ते म्हातारे गृहस्थ पुन्हा म्हणाले.

'होय.' शेतकऱ्यानं उत्तर दिलं.

'बोकड श्रेष्ठ की माणूस श्रेष्ठ ?' ते म्हातारे गृहस्थ म्हणाले.

'माणूस श्रेष्ठ ! पण काहो म्हातारे बाबा ! तुम्हांला त्याच्याशी काय करायचं ? तुमचं काम तुम्ही करा. आमचं काम आम्ही करतो.' शेतकरी त्रासिक स्वरांत म्हणाला.

'मग असं करा.' घाईनं निघून जात असलेल्या शेतकऱ्याला अडवित ते म्हातारे गृहस्थ म्हणाले, 'तुमच्या त्या देवीला बळी दिल्यानं जर पाऊस पडत असेल. दुष्काळाचा सुकाळ होत असेल, हजारो लोकांचे प्राण

वाचत असतील. तर तुमच्या त्या देवीला बोकडाऐवजी माझा बळी द्या.' असं म्हणून ते चटकन मिरवणूकीच्या पुढं झाले.

त्यांचे हे उद्‌गार ऐकून सारे आश्चर्यानं थक्क झाले. सर्वांना त्या म्हाताऱ्या गृहस्थाच्या महानतेचा प्रत्यय आला. त्यांनी आपले डोके त्यांच्या पायावर ठेवले.

—आणि बोकडाला सोडून दिलं.

बालमित्रानो ! ओळखा पाहू हे म्हातारे बाबा कोण !'

तेच आपले परमपूज्य राष्ट्रपिता महात्मा गांधी !

☆ ☆ ☆

## ६ : दोन अश्रू

एकाचं नांव होतं सुगंध आणि दुसऱ्याचं नांव होतं दुर्गंध. दोघंही एकाच वयाचे, एकाच शाळेत आणि एकाच वर्गात शिकणारे होते.

दुर्गंध नांवाप्रमाणेच कुरूप होता. मत्सरी होता. अभ्यासात 'ढ' होता. एका वर्गात त्याला दोन दोन वर्ष काढावी लागत असत. तर सुगंध सुंदर होता. सुस्वभावी होता. हुशार होता. त्यामुळं तो सर्वांचा आवडता झाला होता.

सुगंधची हुशारी पाहून दुर्गंध मनातल्या मनांत जळत होता. त्यामुळं त्याचा पदोपदी अपमान व्हावा. त्याला नेहमी मार पडावा. असंच त्याला वाटायचं आणि त्यासाठी तो प्रयत्न करायचा. संधीची वाट बघायचा.

एकदा काय झालं !

दुपारच्या सुट्टीत गुरुजी घरी गेले. त्यांच्या टेबलवर रजिष्टरं तशीच पडलेली होती. शेजारीच दौतीचा ठोकळाही होता. या टेबलाला कुणीं हात लावू नये, असा

त्यांचा दंडक होता. त्यामुळं सहसा कुणी त्यांच्या टेबलाला हात लावीत नसत. दुपारच्या सुट्टीत मनसोक्त हुंदडणारी मुलं गुरुजींच्या टेबलाला वचकून असत.

पण त्या दिवशी कसा कुणास ठाऊक ! एका मुलाचा टेबलला धक्का लागला. दौत उपडी झाली. आणि सर्व रजिष्टरे शाईत न्हाऊन निघाली.

थोड्याच वेळांत गुरुजी येणार होते... शाई कुणी सांडली, ते विचारणार होते... आणि गुन्हेगाराला यथेच्छ चोप देणार होते...

गुरुजी आले. त्यांनी सारा प्रकार पाहिला. आणि त्यांच्या तळपायाची आग मस्तकांत गेली.

'कुणी सांडली ही शाई ?' गुरुजींनी मुलांना दरडावून विचारलं. त्यांच्या या आवाजानं सारी मुलं घाबरली. कुणीच काही बोलत नव्हतं. सारे चित्रासारखे उभे होते. वाघाच्या तावडीत शेळी सांपडल्यानंतर तिची जी अवस्था होते, तीच त्यांची झाली होती.

एक मुलगा मात्र त्यांना घाबरला नव्हता. तो कसलासा विचार करीत होता. तेवढ्यांत त्याला एक युक्ती सुचली. तो पुढं झाला. आणि गुरुजीला म्हणाला.

'सुगंधनं सांडली सर.'

शाई कुणी सांडली त्याला माहित नव्हतं. पण त्यानं चुगली खाल्ली होती.

गुरुजीनं छडी घेतली. आणि सुगंधला चांगलाच चोप दिला. सुगंध नको नको म्हणत होता. केविलवाणा रडत होता.

—त्याच वेळी तो मुलगा मात्र गालातल्या गालांत हसत होता. विजयी विराच्या उत्साहानं तो मनाशी म्हणत होता, 'कशी जिरली खोड !'

त्या मुलाचं नांव होतं दुर्गंध !

दुसऱ्या दिवशीही तसंच घडलं.

गुरुजीनं शाळेच्या आवारांत काही फुलझाडं लावली होती. त्या झाडांना कुणी हात लावू नये. त्यांची पानं अगर फुलं कुणी तोडू नये, असा त्यांचा दंडक होता. विद्यार्थ्यांनाही त्यांची कडक शिस्त ठाऊक होतीच. त्यामुळं त्याच्या आदेशाविरुद्ध वागण्याची कुणाची छाती नव्हती.

पण एक दिवस एका झाडाचा शेंडा मोडलाच ! कुणी मोडला ते कोणासही ठाऊक नव्हतं. परंतु चालून आलेली संधी दुर्गंधनं गमावली नाही. त्यान चुगली खाल्लीच ! त्याचा परिणाम असा झाला की, त्याही दिवशी गुरुजीनं सुगंधला चांगलंच चोपून काढलं. त्याची नालस्ती केली. सर्व वर्गातून त्याची धिंड काढली. बिचारा सुगंध ! त्याचा काही दोष नव्हता. त्यानं शाई सांडली नव्हती की, झाडाचा शेंडा मोडला नव्हता. पण त्याचं ऐकतंय् कोण ?

दुर्गंध मात्र गालातल्या गालांत हसत होता.

असं रोजच चालायचं. कुणाच्यातरी हातून गुन्हा घडायचा. दुर्गंध चुगली खायचा. आणि सुगंधला मार बसायचा. त्यामुळं सुगंध शाळेला कंटाळला. पण शाळेला 'खो' देणं त्याला पसंत नव्हतं. त्याचा असा विश्वास होता की, एक ना एक दिवस दुर्गंधच्या मनांत परिवर्तन होईलच होईल.

आणि लवकरच तो दिवस चालून आला.

वार्षिक परीक्षा सुरू झाली. एक पेपर झाला. दोन झाले. आणि तिसरा पेपर सुरू होता. तासा-दीड तासांत पांच प्रश्न सोडवायचे होते. त्यामुळं सर्व मुलं घाईत होती. आपला पेपर सोडविण्यात दंग होती. तेवढ्यात,

'पेनमधली शाई संपली,सर.' दुर्गंध उभा राहून बोलत होता. त्याच्या पेनमधली शाई संपली होती. त्यामुळ तो दुसऱ्या पेनची मागणी करीत होता. पण त्याच्याकडं लक्ष द्यायला कुणालाच वेळ नव्हता.

वाऱ्याच्या वेगानं वेळ धावत होता. दुर्गंध नुसताच उभा होता. त्याला कुणी पेन दिली नव्हती. त्यामुळं त्याचा पेपर कोराच राहणार होता. आणि तो परीक्षेत ...

'ही घे पेन.' एका कोपऱ्यातून आवाज उठला. दुर्गंधनं तिकडं पाहिलं.

सुगंध आपल्या चिमुकल्या हातांत सुंदरशी पेन घेऊन उभा होता. त्याला ती घेण्यासाठी खुणावत होता.

दुर्गंधनं पेपर सोडविण्यास सुरुवात केली. पण आता त्याच्या मनांत वेगळेच विचार सुरू होते. ज्याचा त्यानं वर्षभर हेवा केला होता, ज्याच्या त्यानं वर्षभर चुगल्या खाल्ल्या होत्या, ज्याला त्यानं वर्षभर त्रास दिला होता, ज्याचा त्यानं वर्षभर अपमान केला होता, ज्याला त्यानं वर्षभर मार देवविला होता, त्यानंच त्याला मदत केली होती. त्याच्याच मदतीमुळं तो पेपर सोडवित होता. आणि त्याच्याच मदतीमुळं तो पासही होणार होता. त्याला पश्चात्ताप झाला. त्याला राहून राहून वाटत होतं, आपण असं करायला नको होतं....सुगंधला त्रास द्यायला नको होता...

शेवटची घंटा झाली. आणि सर्व मुलं बाहेर पडली.

दुर्गंध धावतच गेला. त्यानं सुगंधच्या पायावर डोकं ठेवलं. आणि म्हणाला, 'मित्रा, मला क्षमा कर आजपर्यंत मी तुझा उगीचच हेवा केला. तुला त्रास दिला. त्यामुळं मी तुझा अपराधी आहे. मला क्षमा कर. मित्रा ! तू महान आहेस. देवमाणूस आहेस. खरोखरचा सुगंध आहेस. मला क्षमा कर... मला क्षमा कर...' बोलतांना त्याचा कंठ दाटून आला होता.

'अरे !...त्यांत क्षमा मागण्यासारखं काय आहे ? अडचणीत सांपडलेल्याला मदत करणं प्रत्येकाचं कर्तव्यच असतं. त्यासाठी मला येवढं देवपण द्यायला नको काही. आज तू मला देवपण देतो आहेस. पण ते तुला सुद्धा

प्राप्त होऊ शकतं. माणसाजवळ मनाचा मोठेपणा असला की, देवपण त्याच्याकडं धावत येतं. चल उठ पाहू आता.' असं म्हणून सुगंधनं त्याचा हात धरून त्याला उठविलं.

त्याच वेळी दुर्गंधच्या डोळ्यांतून टचकन दोन अश्रू घरंगळले. आणि ते सुगंधच्या पायावर सांडले. त्यांच्या रूपानंच जणू तो आपल्या मनांतील सारा हेवा, मत्सर सुगंधच्या पायावर अर्पण करीत होता.

सुगंधनं प्रेमानं त्याच्या पाठीवरून हात फिरविला. आणि दोघेही हसत हसत निघून गेले.

☆ ☆ ☆

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. १५४८०१ नों. दि. २-७-९८
वि. ... ... ...

## ७ : गुरुदक्षिणा

घनदाट अरण्य. श्वापदांची वस्ती. माणसांचा थारा नाही. पाखरांचा वारा नाही. सूर्याचे पाऊल नाही. चंद्राची चाहूल नाही.

अशा त्या घनदाट अरण्यांत गवताची एक चिमुकली झोपडी बांधलेली होती. तिच्यासमोर एक चिमुकला ओटा तयार केला होता. त्यावर एक पंधरा-सोळा वर्षांचा मुलगा बसला होता. त्याच्याजवळ धनुष्य होते. बाण होते. एक एक बाण तो उचलत होता. आणि धनुष्याला जोडून विचारीत होता, 'सोडू ?' आणि मग सोडीत होता.

दिवस उजाडला. रात्र झाली. आणि रात्र संपून दिवस उजाडला. तरी तो बाण सोडीतच होता. सारखा... सारखा...

कोण बरे हा मुलगा ?

त्याचं नांव एकलव्य.

पण तो येथे आला कसा ?

त्याची एक गोष्ट आहे.

एकलव्य इंद्रधनु नांवाच्या व्याधाचा मुलगा. तो या जंगलाचा राजा होता. त्यामुळं एकलव्य स्वत:ला राजपुत्र म्हणवित असे.

एकदा तो दीर्घयष्टी नांवाच्या मित्राबरोबर नेमबाजीचा खेळ खेळत होता. पण त्याचा नेम चुकला. तेव्हा दीर्घयष्टी त्याला म्हणाला, 'वाह्वाऽऽ रे राजपुत्र ! राजपुत्र म्हणवितोस आणि नेम मात्र मारता येत नाही !'

त्याचे हे शब्द एकलव्याला चांगलेच लागले. आणि त्यानं नेमबाजीचं शिक्षण घ्यायचं निश्चित केलं.

जवळच हस्तीनापूर नांवाची पांडवांची राजधानी होती. तेथे गुरू द्रोणाचार्य पांडवांना धनुर्विद्येचे शिक्षण देतात, हे त्यानं ऐकलं होतं. तेव्हा आपणही गुरू द्रोणाचार्यांकडं जाऊन धनुर्विद्येचं शिक्षण घ्यावं, असं त्याला वाटलं.

आणि एक दिवस...

एकलव्य आपले चिमुकले धनुष्य घेऊन हस्तीनापूरात आला.

गांवाबाहेरच्या मैदानातच एक दाढीवाला म्हातारा पांच-दहा मुलांना युद्धकलेचे शिक्षण देत होता.

एकलव्य प्रथमच हस्तीनापूरांत आला होता. तो पांडवांना अथवा गुरू द्रोणाचार्यांनाही ओळखत नव्हता.

त्यामुळं तो त्या दाढीवाल्या म्हाताऱ्याजवळ जाऊन म्हणाला, 'गुरू द्रोणाचार्य कोठे राहतात ते मला सांगाल काय ?'

त्याच्या या प्रश्नाचं द्रोणाचार्यांना मोठं कौतुक वाटलं. हसत हसत ते एकलव्याला म्हणाले, 'कां ? तुला त्यांच्याशी काय काम आहे ?'

'मला त्यांच्याजवळ धनुर्विद्या शिकायची आहे. सांगाल का हो मला गुरू द्रोणाचार्य कोठे राहतात ते ?' एकलव्य म्हणाला.

त्याची शिक्षणाची आवड पाहून द्रोणाचार्यांचं गुरू मन ज्ञानदानाच्या उत्साहानं भरून आलं. शिष्याला असं ताटकळत ठेवणं त्यांना योग्य वाटलं नाही. ते चटकन म्हणाले, 'बाळा ! मीच तो गुरू द्रोणाचार्य !'

'आपणच गुरू द्रोणाचार्य ?' एकलव्य आश्चर्यानं म्हणाला. पण . . . एकच क्षण ! दुसऱ्या क्षणी त्यानं आपलं डोकं गुरू द्रोणाचार्यांच्या पायावर ठेवलं. आणि म्हणाला, 'गुरुजी ! मला क्षमा करा. मला वाटलं होतं की, गुरू द्रोणाचार्य सुदर सुंदर कपडे घालीत असावेत, डोक्यावर रत्नजडीत मुगुट घालीत असावेत, म्हणूनच माझ्या हातून हा प्रमाद घडला. गुरुजी ! मला क्षमा करा.'

तेवढ्यात तेथे पांडव येऊन पोचले. एकलव्याचा तो वावळा वेष पाहून ते त्याची थट्टा करू लागले. पण त्याकडं

दुर्लक्ष करून एकलव्य म्हणाला, 'गुरूजी ! शिकविणार ना मला धनुर्विद्या ?'

'होय.' शब्द द्रोणाचार्यांच्या ओठावर आला होता. परंतु लगेच त्यांना आठवलं की, ते कुरूचे चाकर असून फक्त कौरव-पांडवांनाच त्यांना शिकवायचे होते. त्यामुळं ते एकलव्याला म्हणाले, 'बाळा ! तुझी विद्येची आवड पाहून मला खरोखरच ज्ञानदानाची स्फूर्ति झाली आहे. परंतु बाळा, मी या कुरूचा चाकर असल्यामुळे तुला शिकविता येणार नाही.'

'तुला शिकविता येणार नाही' हे द्रोणाचार्यांचे शब्द ऐकून एकलव्याला धक्काच बसला. तो रडव्या सूरांत म्हणाला, 'मग मी कुणाजवळ शिकू हो ?'

'बाळ ! तू स्वतःच शीक. माझे आशिर्वाद सदैव तुझ्या पाठीशी राहतील. तेच तुला मार्गदर्शन करतील. जा, बाळा जा. तुला सुयश चिंतितो.' असं म्हणतांना गुरू द्रोणाचार्यांच्या डोळ्यांत आसवं उभी राहिली.

एकलव्यानं गुरूजीला नमस्कार केला. आणि तडक या जंगलात आला. त्यानं अशी प्रतिज्ञा केली की, 'जोपर्यंत मी धनुर्विद्येत प्रवीण होणार नाही, तोपर्यंत घरी परतणार नाही.'

त्यानं एक गवताची झोपडी बांधली. मातीचा गुरू द्रोणाचार्यांचा ओबडधोबड पुतळा केला. त्याची झोपडीत

प्रतिष्ठापना केली. दूरच्या झाडावर एक खूण केली. हातात धनुष्य घेतलं. त्याला बाण लावला. आणि त्या पुतळ्याला म्हणाला, 'गुरूजी, सोडू ?'

'सोड.' एकलव्याच्या कानांत आवाज आला. आणि त्यानं पहिला बाण सोडला. आपल्या शिक्षणाचा श्रीगणेशा केला. तेव्हापासून तो सारखा बाण सोडीत होता. घनदाट अरण्याची क्षिति नाही. श्वापदांची भीति नाही. भूकेची गरज नाही. पाण्याची पर्वा नाही. बाणाचे टोक आणि समोरची खूण याशिवाय त्याला काहीच दिसत नव्हतं.

लवकरच तो धनुर्विद्येत प्रवीण झाला.

आता तो बाणाच्या गमती करायचा. कधी तो फुलांना बाणाच्या टोकावर ठेवायचा, आणि अशा रीतीनं बाणामागे बाण सोडायचा की, आकाशांत त्याचा हार दिसू लागे. कधी तो त्या हाराला अशा रीतीनं बाण मारायचा की, तो नेमका दूरच्या देवळातील देवाच्या गळ्यांत जाऊन पडायचा. कधी तो झाडावरचे हवे ते फळ बसल्याजागी बाणाच्या सहाय्याने तोडवून आणून खायचा.

एकदा त्याच अरण्यांत पांडव शिकारीला आले होते. त्यांनी बरोबर आपला कुत्रा आणला होता. शिकारी-साठी तो अरण्यांत दूर दूर फिरत होता. तेवढ्यांत त्याला बाण मारीत असलेला एकलव्य दिसला. त्याचं ते विचित्र

ध्यान पाहून कुत्रा त्याच्यावर भुंकू लागला. पण त्यानं त्याकडं लक्षच दिलं नाही. कुत्रा जेव्हा अधिकच भुंकू लागला तेव्हा त्याला त्याचा राग आला. आणि त्यानं अशा काही कौशल्यानं कुत्र्यावर बाण सोडला की, त्याचा आवाज एकदम बंद !

कुत्रा घाबरला. आणि पळतच पांडवांकडे गेला. कुत्र्याची ती केविलवाणी अवस्था पाहून पांडवांना दुःख झालं. त्यांनी त्याच्या तोंडातल बाण काढला. पण कुत्र्याच्या तोंडाला यत्किंचितही जखम झाली नाही. त्यामुळं सर्वांना आश्चर्य वाटलं.

बाण मारून कुत्र्याचा फक्त आवाज बंद करणारा धनुर्धारी कोण ? सगळे बुचकळ्यांत पडले. कारण ही विद्या फक्त गुरू द्रोणाचार्यांनाच अवगत होती. आणि ते तर या जंगलात येण्याची शक्यता नव्हती. त्यामुळं त्यांची उत्सुकता अधिकच वाढली. आणि....

'बघू या कोण ते ?' असं म्हणून सगळे त्याच्या शोधासाठी निघाले. फिरता फिरता ते एकलव्याजवळ येऊन पोचले. तरी तो एकसारखा बाण मारीतच होता. त्याचा तो वावळा वेप व बाण मारण्याचे कौशल्य पाहून अर्जुन तर दचकलाच !

'आमच्या कुत्र्याचा आवाज बंद करणारा तूच काय ?' अर्जुन पुढं होऊन म्हणाला.

'होय. कां ?' एकलव्य शांतपणे म्हणाला.

अर्जुनाला आश्चर्य वाटलं. त्यानं थोडा विचार केला. आणि त्याला विचारलं, 'तू कोणाचा शिष्य आहेस ?'

'गुरू द्रोणाचार्यांचा.' एकलव्य म्हणाला.

'गुरू द्रोणाचार्यांचा ?' अर्जुनाला आश्चर्याचा धक्काच बसला.

'होय. मी गुरू द्रोणाचार्यांचाच शिष्य.' एकलव्य नम्रपणे म्हणाला.

अर्जुनानं हे शब्द ऐकले मात्र ! तो धावतच द्रोणाचार्यांकडं आला. आणि घाईघाईनं त्यांना म्हणाला, 'गुरुजी, गुरुजी.'

'काय बाळ ?' द्रोणाचार्य शांतपणे म्हणाले.

'तुम्ही मला म्हणाले होते की, तुझ्या तोडीचा दुसरा धनुर्धारी होणार नाही.' अर्जुन चटकन म्हणाला.

'होय. मग !' द्रोणाचार्य म्हणाले.

'मग काय तुम्ही तर त्या भिल्लाच्या पोराला माझ्यापेक्षा जास्त विद्या दिली?' अर्जुन फुरंगटून म्हणाला.

'भिल्लाच्या पोराला ?' द्रोणाचार्यांनं चकित होऊन विचारलं.

'होय. भिल्लाच्या पोराला. तोच कबूल करतो की, तो तुमचा शिष्य आहे म्हणून !' अर्जुन म्हणाला.

'प्रत्यक्षच पाहातो काय ते!' असं म्हणून गुरू द्रोणाचार्य सर्वांसमवेत एकलव्याच्या झोपडीजवळ आले.

एकलव्याने गुरूजींना पाहिले मात्र! तो धावतच त्यांच्याजवळ गेला. आणि त्यानं आपलं डोकं गुरूजींच्या पायावर ठेवलं. त्याला उठवित गुरूजी म्हणाले, 'कोण तू? मी तुला ओळखलं नाही?'

'गुरूजी मी.... तुमचा शिष्य.... कांही दिवसांपूर्वी मी तुमच्याकडं आलो होतो...तुम्ही म्हणाला होता स्वतःच शीक...माझा तुला आशिर्वाद आहे...तोच मी...एकलव्य...भिल्लाचा पोर...!'

गुरू द्रोणाचार्यांच्या डोक्यांत प्रकाश पडला. स्वतःला सावरीत ते त्याला म्हणाले, 'मी तुझी परीक्षा घ्यायला आलो आहे. हा माझा कमंडलू नदीवरून भरून आण पाहू?'

एकलव्यानं कमंडलू घेतला. तो बाणाच्या टोकावर ठेवला. आणि अशा रीतीनं त्यानं बाणामागे बाण सोडले की, तो आपोआप नदीवरून भरून आला.

एकलव्याचे ते कौशल्य पाहून गुरू द्रोणाचार्यांनी तोंडातच बोट घातलं. त्यांनी अर्जुनाकडं पाहिलं. तो पुन्हा त्यांना त्यांच्या वचनाची आठवण करून देत होता.

'अरे, पण तुला हे सारे शिकविले कुणी?' द्रोणाचार्य म्हणाले.

'गुरूजी, तुम्हीच ! ...' एकलव्य नम्रपणे म्हणाला.

'मी ?' द्रोणाचार्य आश्चर्यानं म्हणाले.

'होय, गुरूजी. या झोपडीत मी तुमची एक मूर्ति मांडली आहे. बाण सोडतांना प्रथम मी या मूर्तीला विचारायचा आणि तुम्ही 'हो' म्हणायचे.' असं म्हणून एकलव्यानं त्यांना झोपडीत नेऊन त्यांची मूर्ति दाखविली. ती ओबडधोबड मूर्ति पाहून त्यांचं हृदय प्रेमानं भरून आलं. पण काहीसं आठवल्यासारखं करून द्रोणाचार्य म्हणाले, 'म्हणजे तू माझा शिष्य तर !'

'होय, गुरूजी.' एकलव्य म्हणाला.

'मग माझी गुरुदक्षिणा ?' द्रोणाचार्य चटकन म्हणाले.

'आपणास काय हवे ते मागा. प्रसंगी मी माझं शीरही कापून आपल्या चरणावर अर्पण करीन.' एकलव्य म्हणाला.

'मला तुझे शीर नको. काही नको. फक्त तुझ्या उजव्या हाताचा अंगठा तेवढा दे.' गुरूजी म्हणाले.

अंगठा ? याच अंगठ्यामुळं तर तो धनुर्विद्येत प्रवीण झाला होता. याच अंगठ्यामुळं तर तो कुत्र्याचा आवाज बंद करू शकत होता. याच अंगठ्यामुळं तर त्यानं गुरू द्रोणाचार्यांचा कमंडलू बसल्याजागी भरून आणला होता.

आणि आता हा अंगठा नाही म्हणजे धनुष्य नाही... विद्या नाही... आणि सारंच नाही.

पण त्याच्या हृदयांत गुरुभक्ती उचंबळून आली होती.

त्यानं गुरूजींचे ते शब्द ऐकले मात्र !

चटकन त्यानं बाणाच्या धारदार पात्यानं आपल्या उजव्या हाताचा अंगठा कापून गुरुदक्षिणा दिली.

केवढी ही गुरुभक्ती !

☆ ☆ ☆

# ८ : बंडू आणि चंदू

मार्च महिन्याची पहिली तारीख उजाडते. आणि बाळमित्रांची धावपळ सुरू होते. त्याला कारणही तसंच असतं. हा परीक्षेचा महिना असतो ना !

वर्षभर केलेल्या परिश्रमाचं मूल्यमापन या महिन्यातच व्हायचं असतं. अग्नीत सुवर्ण झोकून देऊन अस्सल सुवर्ण निवडण्याचा हा काळ. प्रत्येक मुलाच्या भाग्याभाग्याचा हा काळ. वर्षभर ज्याची आतुरतेनं वाट बघायची असते तो हा काळ. ज्यासाठी अहोरात्र परिश्रम घ्यावयाचे असतात तो हा काळ.

या महिन्यांत मुलांची कोण धांदल उडून जाते. सारी मुलं आपआपल्या कामात दंग असतात. प्रत्येकजण आपल्या भविष्याचा विचार करण्यात गढलेला असतो. प्रत्येकाच्या हृदयसागरांत 'पास' नावाचं अमूल्य रत्न बाहेर काढण्यासाठी विचारांचं मंथन सुरू असतं.

हा महिना त्यांचा जितका धांदली-काळजीचा असतो तितकाच उल्हासाचाही ! वसंत ऋतुच्या आगमनानं

कोकिळेला जसा आनंद होतो, अगदी तस्साच मुलांनाही होतो. परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या जीवनात दरवर्षी येणारा वसंत ऋतुच होय. या दिवसात त्यांच्या चित्तवृत्ती अधिकाधिक उल्हसित होत असतात.

परीक्षेच्या दिवसांत ज्या अनेक मुलांची धांदल उडून जाते त्यांपैकी, आमचा बंडू हा एक.

आज त्याची परीक्षा सुरू होणार आहे. त्यामुळं सकाळपासूनच त्याची सारखी धावपळ सुरू आहे. तो पुस्तकाचं कपाट उघडतो. अन् त्यातील एकेक पुस्तक चाळू लागतो. पण निराशाच त्याच्या वाट्यास येते. कारण त्याला हवी असलेली अभ्यासाची पुस्तकं मिळतच नाहीत. मग तो चिडतो. स्वतःवर. लहानग्या भावंड्रांवर. पण त्यांत त्यांचा तरी काय दोष ? कोणतीही वस्तू अस्ताव्यस्त टाकण्यापलिकडं बंडूला काहीच ठाऊक नसतं. त्यामुळं त्याला हवी असलेली अभ्यासाची पुस्तकं ऐन वेळी मिळू नयेत, यांत नवल ते काय! खरं म्हणजे आमच्या बंडूला नीटनेटकेपणाचं वळणच नाही.

परीक्षा जसजशी जवळ येत होती तसतशी त्याची अधिकाधिक धांदल उडत होती आणि आता तर प्रत्यक्ष परीक्षेला सुरुवात होणार होती. काय करावं अन् काय करू नये, हेच त्याला कळत नव्हतं. पण त्याची अशी

धांदल उडायला अनेक कारणं आहेत. त्याचा जीवनपट पाहू गेल्यास आपणास ती अवश्य सांपडतील.

दररोज रात्री झोपलेला बंडू सकाळी जागा होतो तो चांगला सूर्यदेव वर आल्यानंतरच. आणि तेही स्वतःहून नव्हे, तर आईच्या कर्णकठोर संगीतानं. बळजोरीनं उठविलेल्या बंडूचं लक्ष सर्वप्रथम जर कुठं जात असेल तर ते विटीदांडूवर. हातांत विटीदांडू घेऊन स्वारी सकाळ-पासून जी घराबाहेर पडायची ती पुन्हा घरी परतायची ती जेवणवेळीच !

आमच्या बंडूचं मित्रमंडळही तसंच आहे. अभ्यासाचं त्यांना वावडं आहे. नेहमी उनाडक्या व खोड्या हाच त्यांचा आवडता व्यवसाय. हेच त्यांचं ब्रीद.

नेहमी खेळात दंग असलेला बंडू भाराभर पुस्तकं घेऊन शाळेत जायचा. तो शाळेत असायचा म्हणजे त्याचं फक्त शरीर ! मन शाळेच्या चार भिंतीत कधीच रमलं नाही. ते नेहमी मित्रमंडळ, नवनवीन खेळ यांच्या चिंतनात दंग असायचं. त्यामुळं शाळेत गुरूजी काय शिकवितात याकडं त्याचं लक्षच नसायचं. त्याचं लक्ष असायचं ते शेवटचा टोला केव्हा होतो, व शाळेच्या कारागृहातून आपली सुटका केव्हा होते याकडं. त्याचा शाळेतील वेळ संपूर्ण या विचारातच खर्च व्हायचा.

स्वारी शाळेत तरी स्वस्थ बसते काय ? मुळीच नाही. याच्या खोड्या काढ, त्याला चिमटा घे. सारखं सुरू असायचं. शेवटी एकदाचा टोला व्हायचा आणि स्वारी सजा संपल्याच्या आविर्भावात शाळेतून बाहेर पडायची. पाटी-पुस्तकं उद्यापर्यंत खुंटीला टांगली जायची. आणि त्याचा नित्यक्रम सुरू व्हायचा. प्रथम खेळ, नंतर जेवण. आणि त्यानंतर झोप. खुंटीवर टांगलेल्या पुस्तकाला त्याचा हस्तस्पर्श व्हायचा तो दुसरे दिवशी शाळेत जातानाच !

बंडोबाचा असा नित्यक्रम सुरू असायचा त्यामुळं वर्गात गुरूजीनं काय शिकविलं याकडं त्याच लक्ष नसायचं. वर्षभरात कधी त्यानं पुस्तक उघडून बघितलं नाही. आणि आज तर प्रत्यक्ष परीक्षेचा दिवस ! मनात मात्र पास होण्याची प्रबळ इच्छा आहे. त्यमुळंच त्याची अशी धांदल उडत आहे. नेहमी खेळात गर्क असणाऱ्या आमच्या बंडूला अभ्यास कसा करावा, हेसुद्धा माहित नाही. आणि म्हणूनच भाषेचा पेपर असतांना आमचा बंडू इतिहासाचा अभ्यास करून आज परीक्षेच्या रणक्षेत्रात उतरत आहे. बघू या काय होतंय् ते !

आणि ... हा आमचा चंदू.

रोज सकाळी उठायचा. प्रथम शौचमुखमार्जन. नंतर दूध. त्यानंतर दोन तास अभ्यास. घंटा होताच शाळेत

जायची त्याला घाई व्हायची. त्यानं शाळेला किंवा अभ्यासाला कधी 'खो' दिला नाही. कारण 'नियमित शाळा, नियमित अभ्यास, परीक्षेत मिळे यश हमखास' याची त्याला जाणीव आहे. म्हणूनच सूर्य जसा पृथ्वीवर येण्याचं टाळीत नाही तद्वतच चंदूनंही अभ्यासाला कधी टाळलं नाही. शाळेत त्यानं कधी कुणाच्या खोड्या काढल्या नाहीत. कुणाशी मारामारी केली नाही. त्याचं सारं लक्ष वर्गात शिकविणाऱ्या गुरूजींकडं केंद्रित झालेलं असायचं. गुरूजी जे शिकवित ते तो लक्ष लावून ऐकायचा. घरी जाऊन त्याचं वाचन, मनन करायचा. शाळेला सुट्टी होताच तडक घरी परतायचा. रस्त्यात रेंगाळून वेळेचा व्यय करणं त्याला मुळीच रुचत नसे बुद्धि कार्यक्षम होण्यासाठी नियमित वाचन व शरीर सुदृढ होण्यासाठी नियमित व्यायाम आवश्यक असतो, हे त्याला चांगलंच ठाऊक आहे व त्याप्रमाणं करायलाही तो कधी विसरत नाही.

चंदूला अभ्यास करायला कधी त्याच्या आई-बाबांना सांगावं लागत नाही. आईला कर्णकठोर आवाजात त्याला कधी झोपेतून उठवावं लागत नाही. त्याच्या बिछान्यानं कधी सूर्योदय बघितला नाही. सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत त्याची सारी कामं घड्याळाच्या गतीनं पार पडायची. पण घड्याळाला जशी केव्हा तरी किल्ली द्यावी लागते तशी चंदूला कधी आवश्यकता भासली नाही.

परीक्षेचा महिना उजाडतो. आणि त्याची परीक्षेची पूर्वतयारी सुरू होते. प्रत्येक विषयाला तो समान दिवस वाटून देतो. प्रत्येक विषयाचं तो मननपूर्वक वाचन करतो. परीक्षा आठ दिवस असतांना तो पुन्हा साऱ्या विषयांची एकदा उजळणी करतो. अन् शक्य झाल्यास दोनदा .. तिनदा... पण नुसतं वाचायचं म्हणून नव्हे, तर अगदी मन लावून !

याप्रमाणं आताही त्याची पूर्वतयारी झाली आहे. आणि जसजसा प्रत्येक पेपरचा दिवस उजाडतो तसतसा त्या त्या विषयावर अखेरची नजर टाकून तो परीक्षेला जात असतो. या पद्धतीनं तो संपूर्ण पेपर देत आहे. नियमित शाळा, नियमित अभ्यास . . . मग काय ! यश हमखास त्याच्या पाठोपाठ धावत सुटल्यास नवल ते काय ?

बालमित्रांनो ! तुमच्यासमोर अभ्यासाला टाळून उनाडक्या करणाऱ्या बंडूचं व नियमित अभ्यास करणाऱ्या चंदूचं, अशी दोन चित्रं उभी आहेत. आता तुम्हीच ठरवा यांपैकी कोणतं तुम्हाला आवडतं ते !

☆☆☆

म. ग्रं. सं. ठाणे. ग्रन्थालय शाखा
दा. क्र. १५४८९ दि. २४/१/९४
वि. [illegible]
IRBK-0115475